| MHBI150015572022 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४२५/२०२२ मधील निशाणी क्र. १ खालील आदेश (बाळकृष्ण माधवराव कुलकर्णी विरुध्द कोणीही नाही)** |
|---|---|

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे कथन असे की, माधवराव राजाराम कुलकर्णी हे मौजे अंमळनेर भां., ता.पाटोदा,जि.बीड येथील रहिवाशी होते व ते दिनांक २५.०९.१९८७ रोजी अंमळनेर भां. येथे मयत झालेले आहेत. तसेच मयताची पत्नी मनोरमा माधव कुलकर्णी या दिनांक ०३.०६.२००७ रोजी मयत झालेल्या आहेत. तसेच मयताचा एक मुलगा शरद माधवराव कुलकर्णी हा दिनांक २७.०७.२००८ रोजी अविवाहीत व विनाअपत्य मयत झाला आहे. तसेच मयताचे आई–वडिल ब–याच वर्षापूर्वी मयत झालेले आहेत. अर्जदार हा मयताचा एकुलता एक मुलगा आहे. मयतास अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. माधवराव राजाराम कुलकर्णी यांचा मृत्यू झाल्यानंतर अर्जदार यांनी त्यांच्या कार्यालयीन कामकाजासाठी संबंधित कार्यालयात गेला असता संबंधीत अधिका–यांनी त्यांना सक्षम कोर्टाकडून वारस प्रमाणपत्र हजर करणेस सांगितले. म्हणून अर्जदार यांनी वारस दाखला (Heirship Certificate) मिळणेबाबत सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदार बाळकृष्ण माधवराव कुलकर्णी यांनी स्वतःचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.११ वर सादर केले आहे. त्यांनी अर्जातील कथनांप्रमाणे सर्व कथने प्रतिज्ञापत्रात केलेली आहेत. तसेच कागदोपत्री पुरावा म्हणून निशाणी ६ वर मयत माधवराव राजाराम कुलकर्णी यांचा मृत्यू दाखला,निशाणी ७ वर मयत

मनोरमा कुलकर्णी यांचा मृत्यू दाखला, निशाणी ८ वर मयत शरद कुलकर्णी यांचा मृत्यू दाखला, निशाणी ४ सोबत अनुक्रमांक ४ वर अर्जदार यांच्या आधारकार्डची सत्यप्रत, निशाणी १२ वर अर्जदार यांचे मयताचे रेशनकार्ड नसलेबाबतचे शपथपत्र, तसेच निशाणी ११ वर अर्जाची जाहीर नोटीस "दैनिक बीड संकेत" या वृत्तपत्रातील जाहीरनामा दाखल केलेला आहे. अर्जदार यांच्या तर्फे पुरावा बंद पुरसिस निशाणी क्र.१३ वर दाखल केलेली आहे.

**४.** अर्जदार यांच्या तर्फे विधीज्ञ श्री. सी. एस. कांकरीया यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. अर्जदारांतर्फे विधीज्ञ यांनी अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केला.

**५.** अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत माधवराव राजाराम कुलकर्णी हे अर्जदार चे वडिल होते. अर्जदार यांनी दाखल केलेल्या निशाणी ०६ वरील मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, माधवराव राजाराम कुलकर्णी हे दिनांक २५.०९.१९८७ रोजी अंमळनेर भां. येथे मयत झालेले आहेत. अर्जदार यांनी निशाणी ११ वर त्यांचे शपथपत्र दाखल करुन अर्जातील कथनेच नमुद केली आहेत. अर्जदार यांचे अर्जास जाहीर नोटीस प्रसिध्द करुनही अर्जात हजर होवून कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. त्यामुळे अर्जदार यांनी अर्जात कथन केलेली सर्व कथने अबाधीत राहीलेली आहेत.

**६.** अर्जाचे वरील विवेचनावरुन व अर्जदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रानुसार, अर्जदार हेच मयत माधवराव राजाराम कुलकर्णी यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येत असल्याने, अर्जदार यांचा अर्ज मंजूर करणेस कोणतीही अडचण दिसून येत नाही. परिणामतः अर्जदार हे वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेकरीता पात्र असल्याचे दिसून येते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) **अर्जदार** बाळकृष्ण माधवराव कुलकर्णी, हे मयत माधवराव राजाराम कुलकर्णी यांचे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ मधील तरतुदीनुसार कायदेशीर वारस असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

३) सदरचे वारसा प्रमाणपत्र हे अर्जात नमुद कारणासाठी म्हणजेच वारस असलेबाबत लागू राहील इतर कोणत्याही कारणाकरीता लागू राहणार नाही.

४) **अर्जदार** बाळकृष्ण माधवराव कुलकर्णी, यांना त्यांचे नावे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) देण्यात यावे व सिव्हील मॅन्युअल प्रकरण १४ मधील परिच्छेद क्र. ३१२ प्रमाणे मुळ वारस प्रमाणपत्रावर टीप नमुद करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Snehal Nivasrao Nikam
Date: 2022.12.02 17:25:53 +0530

ठिकाण– पाटोदा ( श्रीमती एस.एन.निकम )

दिनांक– ०१/१२/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पाटोदा